**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## तीन व पाचवर्षीय विधी अभ्यासक्रम प्रथम सत्र परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना सूचना

अमरावती.

तीन व पाचवर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र परीक्षेबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी सी.ई.टी. प्रवेश प्रक्रियेमुळे सत्र २०१७-१८ करीता महाविद्यालयांमध्ये नियमित विद्यार्थी म्हणून उशिरा प्रवेश घेतला, त्यांची प्रथम सत्राची हिवाळी २०१७ मध्ये होणारी परीक्षा उन्हाळी २०१८ ला घेण्यात आली होती. जे विद्यार्थी उन्हाळी २०१८ परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, यासाठी विद्यापीठाने सदर विद्यार्थ्यांकरीता विशेष परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. सदर विद्यार्थ्यांची परीक्षा दि. १६ ऑगष्ट, २०१८ पासून सुरु होत असून विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्यासाठी विद्यापीठाच्या www.sgbau.ac..in या संकेतस्थळावर लिंक ओपन करण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घेवून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २३/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी